| | |
|---|---|
| MHKO110008822016 | **नियमित दिवाणी दावा क्र. १४६/२०१६**<br>**निशाणी क्रमांक ६७ वरील आदेश**<br>**( अस्मीता दिपक पोवार वगैरे २ विरुध्द श्री.दिपक लक्ष्मण पोवार वगैरे ५ )** |

सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तुत कामी वादीचे कथन असे की, प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादीविरुध्द कायम मनाईकरीता व वाटपासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत कामी प्रतिवादी हे हजर होऊन त्यांनी म्हणणे दाखल केले आहे. त्यानंतर प्रस्तुत कामात युक्तीवाददेखिल पूर्ण झालेला आहे. परंतू त्यानंतर सदर दाव्यात आवश्यक पक्षकार सामील नसल्यामुळे दावा बाधीत होत असल्याचा अतिरिक्त मुददा काढल्यामुळे दावा मिळकतीच्या सात बारा सदरी असलेल्या इतर सह हिस्सेदारांना प्रसतुत कामात आवश्यक पक्षकार करणे गरजेचे झालेले आहे. त्यामुळे त्या अनुषंगाने दुरुस्ती होणे गरजेची आहे. सदरची दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादीस कोणतेही तोषीस लागणार नाही. याउलट नामंजूर झालेस वादीचे कशानेही न भरुन येणारे अतोनात नुकसान होणेची शक्यता नाकारता येणार नाही. सबब, वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन तो मंजूर करणेची विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाचे पाठीमागील बाजूस आपले म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. प्रतिवादींच्या मते, प्रतिवादीने त्यांच्या कैफियतीमध्ये आवश्यक पक्षकार नसल्याबाबत कथन केले आहे. परंतू त्यानंतरदेखिल आजतागायत वादीने त्याबाबत कोणतीही दुरुस्ती मागितलेली नाही. त्यानंतर वादी व प्रतिवादी यांचा पुरावादेखिल संपलेला आहे. अशा परिस्थीतीत वादी मागत असलेली दुरुस्ती योग्य नाही. तसेच वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १ नियम १० प्रमाणे अर्ज देणे अपेक्षित

होते. परंतू त्यांनी सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ नियम १७ प्रमाणे दिलेला आहे. सबब, तो चालणेस पात्र नाही. शेवटी त्यांनी वादी यांना रक्कम रुपये ५०००/– दंड करुन अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

**०४.** प्रस्तुतचा अर्जाचे अवलोकन केले आणि वादीच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. यावरुन खालील मुद्दे माझ्या पुढे उपस्थित झाले त्यावरील कारणांसहित निष्कर्ष खालील प्रमाणे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | वादी यांनी मागितलेल्या दुरुस्तीमुळे त्यांचे मुळ दाव्याचे स्वरुपात बदल होणार आहे काय ? | **....नाही** |
| **२.** | सदरची दुरुस्ती ही मुळ दाव्याच्या अंतिम निकालाकरीता आवश्यक आहे काय ? | **....होय** |
| **३.** | काय आदेश ? | **...वादीचा अर्ज मंजूर करणेत आला** |

**०५.** प्रस्तुत दावा, तसेच अर्ज, वादीच्या व प्रतिवादीच्या विद्वान विधीज्ञांच्या युक्तीवादाचे अवलोकन केले. युक्तीवादा दरम्यान वादीच्या व प्रतिवादीच्या विद्वान विधिज्ञांनी त्यांच्या अर्जातील मजकूराची पुनरावृत्ती केली आहे.

## **–कारणमिमांसा–**

**०६.** मुददा क्रमांक १ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे चर्चेची पुनरावृत्ती टाळणेसाठी सदरचे तीनही मुददे मी एकत्रीत विचारात घेत आहे.

०७. प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिताच्या आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे. त्यामुळे सदर नियमात सांगितल्याप्रमाणे जर दाव्याचे स्वरुप बदलत नसेल व करण्यात येणारी दुरुस्ती ही पक्षकारातील वाद मिटवणेसाठी तसेच दावा गुणवत्तेवर निकाल होणेसाठी आवश्यक असेल तर सदर दुरुस्ती करण्यास परवानगी देण्याची तरतूद आहे. सदर तरतूदीच्या अनुषंगाने प्रस्तुतचा अर्ज न्यायनिर्णित करणे आवश्यक आहे.

०८. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द कायम मनाईकरीता व वाटपासाठी दाखल केला सदर तरतूदीच्या अनुषंगाने प्रस्तुतचा अर्ज न्यायनिर्णित करणे आवश्यक आहे. दाव्याचे स्वरुप व वादीचे वादपत्रातील कथन पाहता वादीने मागितलेली दुरुस्ती दिल्यास दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होत नाही. उलटपक्षी पक्षकारामध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णित करण्यासाठी मदत होणार आहे. दुरुस्तीस मंजूरी दिल्यास दाव्यातील गुंतागुंत कमी होणार आहे. उलटपक्षी प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी व प्रतिवादींमधील दाव्यांची संख्या वाढून अनेकविध होण्याची शक्यता आहे. तसेच प्रतिवादी यांना पुरावा देणेची संधी असलेने सदर दुरुस्तीमुळे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच या न्यायालयाने अतिरिक्त मुददे काढून त्यावर वादी व प्रतिवादी यांना पुरावा देणेची मुभा दिलेली आहे. त्यामुळे वादी यांना अतिरिक्त मुददया संदर्भात पुरावा देणेची संधी देणे कायदेशीरदृष्टया योग्य व आवश्यक वाटते. तसेच वादी मागत असलेली दुरुस्ती ही प्रथमदर्शनी दाव्याची कार्यवाही लांबविणेच्या उददेशाने दिसून येत नाही. सबब प्रस्तुत अर्जाचा खर्च वादीवर ठेवणे योग्य होणार नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी व मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.३ करिता खाली आदेश पारीत करतो.

## – आदेश –

१. वादीचा प्रस्तुत अर्ज (निशाणी ६७) मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने अर्जामध्ये नमूद केलेली दुरुस्ती ही या आदेशाचे तारखेपासून १४ दिवसांचे आत वादपत्रात करणेची आहे.

३. वादीने सदर वादपत्राची दुरुस्त प्रत सत्वर द्यावी.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT

Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2023.01.25 12:12:42 +0530

दिनांकः– २४.०१.२०२३
ठिकाण – पेठवडगांव

( एस.डी.शिरसाट)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पेठवडगांव